# औरंगाबाद महानगरपालिका औरगाबाद

## दिनांक १८.०५.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दि.१८ मे २००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा '' प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १२.४० वाजता '' वंदेमातरम् '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री नंदकुमार राधाकिसन घोडेले
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०९. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
१०. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
११. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१२. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१५. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१६. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१७. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
२०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
२१. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
२२. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२४. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२५. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२६. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२७. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२८. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२९. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
३०. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
३१. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३२. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग

३३. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३४. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३५. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान
३६. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३७. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३८. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३९. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
४०. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
४१. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
४२. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४३. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४४. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४५. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४७. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४८. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४९. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
५०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५१. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
५२. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५३. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५४. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५५. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५६. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५७. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५८. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५९. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
६०. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६१. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६२. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६३. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६४. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
६५. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६६. श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६७. स.स.श्री.कै सर खान बद्रोद्दीन खान
६८. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६९. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७०. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७१. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
७२. स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०३. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद :**

श्री.भागवत कराड : प्राख्यात व जेष्ठ कवीवर्य व सामाजिक कार्यकर्ते स्व.वामनदादा कर्डक यांचे नुकतेच दु:खद निधन झाले,त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यांत यावी.

श्री.भगवान रगडे : तसेच या शहरातील एक रिक्षा चालक श्री.बनकर महादु यांचे दुर्दैवी निधन झाले, त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : श्रध्दाजंली साठी सर्वांनी उभे राहावे.

याचवेळी स्व.वामनदादा कर्डक तसेच स्व.महादु बनकर यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यांत आली.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : या शहराचे खासदार म्हणून मा.चंद्रकांतजी खैरे यांची निवड झाली त्याबध्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यांत यावे.

श्री.जयवंत ओक : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.भागवत कराड : स.श्री.चंद्रकांतजी खैरे या सभागृहाचे माजी सदस्य होते. त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.मीर हिदायत अली : केंद्रात सर्व पक्षीय सेक्युलर पक्षाचे सरकार बहुमाताने निवडूण आले त्यांचाही
श्री.अफ़सरखान अभिनंदनाचा ठराव सम्मत करावा.

श्री.स.अली सलामी : सोनिया गांधी सेक्युलर म्हणून निवडूण आले. त्यांचे अभिनंदन करावे.

मा.महापौर : अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : कॉंग्रेस संयुक्त आघाडीचे सरकारला बहुमत आहे, आजपर्यंत सिध्द झालेले नाही. पंतप्रधान झालेले नाही. जेंव्हा होतील तेंव्हा मांडू. त्यामूळे अभिनंदनाचा ठराव घेण्याची आवश्यकता नाही.

मा.महापौर : मा.खासदार श्री.खैरे यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते.

श्री.स.अली सलामी : जातीय वादाचा सुर्यास्त झाला. मा.सोनिया गांधी, श्री.पवार यांचे लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रात स्थापन झाले त्याबध्दल अभिनंदन करण्यांत यावे. शाईनिंग इंडिया, फ़िलगुड फ़ेल गेले.

श्री.भगवान घडमोडे : या शहरातील विकास कामे होण्याच्या दृष्टीने सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. ज्यांना बोलायचे त्यांनी बाहेर जावून बोलावे.

सौ.निखत परविन : एक महिला मा.सोनिया गांधी यांचे प्रयत्नाने केंद्रात कॉग्रेस व इतर आघाडी पक्षाचे सरकार होणार आहेत सोनिया गांधी पंतप्रधान होणार आहेत. अभिनंदन करण्यात यावे.

श्री.भागवत कराड : जेव्हा पंतप्रधान होतील तेव्हा या सभागृहात अभिनंदनाचा ठराव पास करावा.

मा.महापौर : विषय क्र.१ बाबत मुख्य लेखाधिकारी यांनी निवेदन करावे.

श्री.भगवान रगडे : ज्यांचे सरकार येईल त्यांचे अभिनंदन करावे.परंतू नुकताच काही दिवसा पूर्वी खडकेश्वर भागात महादू बनकर नावाच्या रिक्षा चालकाचा एका महिलेचा प्राण वाचवितांना स्वत:चा जीव धोक्यात टाकून मृत्यू झाला. याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे याबाबत चर्चा करण्यात यावी.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : मा.महापौर व पदाधिकारी यांचे बैठकीत व स्थायी समितीच्याही बैठकीत संबंधीत व्यक्तीस/ कुटुंबीयास तात्काळ २०,०००/- रूपयाची आर्थिक मदत करण्यात यावी म्हणून निर्णय घेतलेला होता. त्यानुसार ती रक्कमही देण्यात आली. अर्थसंकल्पीय बैठक आहे. इतर विषयावर चर्चा होऊ नये.

श्री.नासीरखान अ.रहेमानखान : कोण निवडूण आले, कोण हारले त्यांचा या सभागृहाशी संबंध नाही. शहराच्या विकास कामा संदर्भात चर्चा करावी. सिल्लेखाना भागात अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना मारहाण होते. पोलीस पथक बरोबर असतांना असा प्रकार होत असेल तर दुर्दैवी घटना आहे. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार आहेत खुलासा करण्यांत यावा.

मा.महापौर : अर्थसंकल्पीय बैठक आहे.चर्चेच्यावेळी येईल.

सौ.लिलावती घायतिलक : जानेवारी २००३ रोजी महापालिकेचे एक दैनिक वेतन कर्मचारी याचा मृत्यु झाला त्या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

श्री.स.अली सलामी : अतिक्रमण काढण्यासाठी महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी पोलीस पथकासह गेले होते. १५ पोलीस पथक संरक्षणासाठी असतांना कर्मचारी/अधिकारी यांना मारहाण होते. हे खरे की खोटे आहे. शहरात अशी चर्चा ऐकावयास येते की, पोलीसांनी जाणून बुजून बघ्याची भुमिका घेतली. पोलीस पथक काम करीत नसेल, महापालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने त्यांचेकडून काम होत नसेल तर पोलीस चौकी ठेवण्याची गरज काय? असा प्रश्न निर्माण होतो. पोलीस खात्यात जे पोलीस शिपाई काम करीत नाही असे कर्मचारी महापालिकेकडे पाठविलेले आहेत. अशा प्रकरणात एखाद्या व्यक्तीला जिवंत मारल्यानंतर यास जबाबदार कोण? खऱ्या अर्थाने पोलीस पथकाने कर्मचाऱ्यांचे संरक्षण केले नसेल तर काय कार्यवाही करणार आहेत. त्याचा खुलासा करावा. त्यानंतर पूढील कामकाज घेण्यात यावे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : अधिकाऱ्यावर / कर्मचाऱ्यावर हल्ला होत असेल व पोलीस बघ्याची भुमिका घेत असेल तर मा.आयुक्त कार्यवाही करतील. आज अर्थसंकल्पीय सभा आहे. पूढील सभेत याबाबत चर्चा करणे योग्य होईल.

श्री.अफ़सरखान :अधिकाऱ्यावर हल्ल्याची चर्चा व्हावी. त्यांचेवर महापालिका वर्षाला किती खर्च करते याचाही खुलासा व्हावा. जादा खर्च होत असेल तर त्यांची गरज नाही.

मा.महापौर : श्री.खैरनार यांनी चौकशी करावी.

**<u>विषय क्र. ३११/ १ :</u>**

सन २००३-२००४ चे सुधारित व २००४-२००५ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

मा.महापौर : विषय क्र.१ संदर्भात मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : दि.१० व ११ फ़ेब्रुवारी २००४ रोजी स्थायी समितीच्या बैठकीत मा.आयुक्तांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा होवून स्थायी समितीने त्या अर्थसंकल्पात काही दुरूस्त्या करून स्थायी समितीच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेपूढे अर्थसंकल्प मंजूरीसाठी सादर केलेला आहे. दरम्यानच्या काळात आचारसंहिता असल्यामुळे अर्थसंकल्पास सर्वसाधारण सभेत मंजूरी घेता आलेली नाही. या मधल्या कालावधीतच काही पदाधिकारी यांची नव्याने निवड झालेली आहे. माजी सभापती श्री.भाऊसाहेब ताठे, मा.महापौर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतील. तसेच उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतील. विद्यमान सभापती श्री.नंदकुमार घोडेले हे मा.विरोधीपक्ष नेते,

मा.सभागृह नेते यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतील. माजी सभापती श्री.ताठे यांचे स्वागत प्रशासनातर्फे उपआयुक्त श्री.शिंदे साहेब करतात.

(पुष्पगुच्छ देवून पदाधिकारी व माजी सभापती यांचे स्वागत करण्यांत येते.) आता विद्यमान सभापती व माजी सभापती यांना विनंती की, त्यांनी अर्थसंकल्प मा.महापौरांकडे सादर करावा.

श्री.सुनिल मगरे : दोन सभापती एक अर्थसंकल्प सादर करू शकत नाही. कोणीही एकानेच सादर करावे.

श्री.प्रकाश निकाळजे : नियम वाचून दाखवावे. चुकीचा पायंडा पाडू नये.

याचवेळी मा.माजी सभापती व विद्यमान सभापती मा.महापौराकडे अर्थसंकल्प सादर करतात.

याचवेळी सभागृहात काही सदस्य मा.महापौरांच्या डायस समोर जावून मोठ्मोठ्याने बोलतात काही ऐकावयास येत नाही.

मा.महापौर : एका वेळेस एकाच सदस्यांनी बोलावे. नसता सभागृहा बाहेर काढले जाईल. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. सभापती यांनी अर्थसंकल्पीय त्यांचे निवेदन वाचून दाखवावे.

श्री.भाऊसाहेब ताठे : (अर्थसंकल्पातील निवेदन वाचुन दाखवितात.)

श्री.सुनिल मगरे : दोन सभापती एक अर्थसंकल्प सादर करू शकतात का ? सचिवांनी खुलासा करावा.

मा.महापौर : आपण केलेल्या सुचनांची इतिवृत्तात नोंद घेतली आहे. अर्थसंकल्पाच्या विषयावर चर्चा करता येईल. आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यांत येते.

(वेळ दुपारी १.२० वाजता सभेला सुरूवात १.४० वाजता)

मा.महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी विषय क्र.१ च्या संदर्भात निवेदन करावे.

मुख्यलेखाधिकारी : आताच मा.महापौरांकडे अर्थसंकल्प सादर केला. प्रत्यक्षात ३१ मार्च २००४ पर्यंत वसुली व खर्च या बाबतचे निवेदन सादर आहे. सन २००३-२००४ चा सुधारीत अर्थसंकल्प ११८.५१ कोटीचा होता. प्रत्यक्षात वसुली ही ११५.४७ कोटी झालेली आहे. मार्च अखेर ११० कोटी रूपये खर्च झालेले आहेत. स्पील ओव्हरच्या कामात वाढ झाली. फ़ेब्रुवारी महिन्यात आचारसंहिता लागल्यामूळे नविन कामांची निविदा कार्यादेश देता आले नाही. साधारणत: ५ कोटीची अतिरिक्त स्पील ओव्हर मध्ये वाढ झाली. प्रत्यक्ष स्पील ओव्हरमध्ये मुळ अंदाजपत्रकात वाढ होवून सुधारित स्पील ओव्हर १३.२३ कोटीचे झाले. यात ६.७१ जून पर्यंत व ७.६० कोटीची वाढ लक्षात घेवून नविन कामे समाविष्ट करण्याबाबत व ५ कोटी सरप्लस विचारात घेवून चर्चा करण्यास हरकत नसावी.

मा.महापौर : उत्पन्नाच बाजुने चर्चा करावी.

श्री.प्रशांत देसरडा : सुधारीत अर्थसंकल्पानुसार कोणत्या झोनची वसूली किती टक्के झालेली आहेत. झोन वाईज माहिती देण्यात यावी.

श्री.भागवत कराड : ३१ मार्च पर्यंत जकातीची वसूली किती झालेली आहेत. अर्थसंकल्पात प्रशासनाने चालू वर्षासाठी जकातीचे ७२ कोटीचे उद्दीष्ट दिलेले आहे.

मा.उपमहापौर : जकातीचे उत्पन्न किती आलेले आहेत तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी किती वसूल झाले. माहिती घेतल्यास पूढील चर्चा करणे योग्य होईल.

मुख्यलेखाधिकारी : जकातीचे उद्दीष्ट गत वर्षाचे मुळ उद्दीष्ट ६९ कोटीचे होते सुधारीत मध्ये ६४ कोटी करण्यांत आले, प्रत्यक्षात वसूली ६२.८३ कोटी झालेली आहे. मालमत्ता कराचे मुळ उद्दिष्ट २३ कोटीचे होते. सुधारीत बजेटमध्ये १३ .०० कोटी करण्यांत आले, प्रत्यक्षात वसूली रू.११.१४ कोटी झालेली आहे. नगररचना विभागाचे मूळ उद्दिष्ट ४.५५ कोटीचे होते. सुधारीत मध्ये ३.५० कोटी करण्यांत आले. प्रत्यक्षात वसूली ३.९० कोटी झालेली आहे. आरोग्य विभागाचे मुळ उद्दिष्ट ३३ लक्ष होते. सुधारीत मध्ये २० लक्ष करण्यांत आले. प्रत्यक्षात वसूली १९ लक्ष झालेली आहे. प्राणी संग्रहालयाचे मुळ उद्दिष्ट ३५ लक्ष होते. सुधारीत मध्ये ३३ लक्ष करण्यांत आले,प्रत्यक्षात वसूली ३२ लक्ष झालेले आहेत.उद्यान विभागाचे मुळ उद्दिष्ट २९ लक्ष सुधारीत २५ लक्ष व प्रत्यक्षात वसुली ३१ लक्ष झालेली आहे. मालमत्ता विभागाचे मुळ उद्दिष्ट २.०० कोटी सुधारीतमध्ये २.०५ कोटी प्रत्यक्षात वसूली रू.१.६४ कोटी, पाणीपट्टी शहर २७ कोटी, सुधारीत ११.२२ कोटी तर प्रत्यक्षात वसूली ९.३७ कोटी झालेली आहेत. पाणीपट्टी जायकवाडी, ३.०० कोटीचे मूळ उद्दिष्ट होते. सुधारीत मध्ये ३.२० कोटी करण्यात आले प्रत्यक्षात वसूली ३.५७ कोटी झालेली आहेत. अग्निशमन विभाग ५० लक्ष उद्दिष्ट होते. ३१ लक्ष सुधारीत करण्यात येवून प्रत्यक्षात वसूली १९ लक्ष झालेली आहेत. अनुदान १३ कोटी गृहीत धरण्यात आले, सुधारीतमध्ये १३.५० कोटी करण्यात आले. प्रत्यक्षात १३.४० कोटी प्राप्त झाले. इतर कर जो ६.१४ कोटी गृहीत धरलेले होते सुधारीत मध्ये ७.९५ केलेले होते प्रत्यक्षात वसूली ८.६२ कोटी झालेले आहे. सर्व वसूलीचा आढावा घेतला असता मुळ अंदाजपत्रक १४९ कोटी उद्दिष्ट होते. सुधारीत मध्ये ११८.५१ कोटी तर प्रत्यक्षात वसूली ११५.४८ कोटी झालेली आहेत.

श्री.प्रशांत देसरडा : अर्थसंकल्प प्रशासनाने तयार केला स्थायी समितीने मान्यता होवून सर्वसाधारण सभेकडे पाठविला. उत्रूली एवढी कमी का याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.भागवत कराड : उत्पन्न वाढीवर आपण चर्चा करीत आहोत. ६९ कोटीचे जकातीचे उद्दिष्ट होते. फ़क्त ६२ कोटी प्राप्त झाले. ८ कोटीची तुट निर्माण होते. यावर्षी सुध्दा ७२ कोटी दिले आहे. मागील वर्षाचे अर्थसंकल्प मंजूर करतांना नाक्यावर कॅमेरे, इंटरनेट कनेक्शन करावे. याबाबत चर्चा होवून निर्णय घेतलेला होता त्याची दखल घेतली जात नाही. जकात वाढविण्यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले, याबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : उद्दिष्टाप्रमाणे वसुली होत नाही. उद्दिष्ट वाढविण्यासाठी प्रशासनास काय अडचण आहे, सभागृहासमोर सुचना कराव्यात.

मा.महापौर : उपआयुक्त (म.) यांनी सविस्तर खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) : प्रशासनाने सन २००३-२००४ या वर्षाकरीता जकातीचे ६९ कोटी उद्दिष्ट ठेवलेले होते. सुधारीत अर्थसंकल्पात ६४ कोटी करण्यांत आले. प्रत्यक्षात वसूली ही ६३.३४ कोटी झालेली आहे. वसूली जास्तीत जास्त करण्यासाठी प्रशासनाने अतिरिक्त भरारी पथके स्थापन केलेली आहे व जकात चोरी होऊ नये म्हणून ही भरारी पथके स्थापन करून मोठ्या प्रमाणात जकात वसूली केलेली आहे. सन २००२-२००३ च्या तुलनेत यावर्षी ६.१० कोटी जास्त वसुली जकातीमध्ये झालेली आहेत. सन २००३-२००४ या वर्षाभरात एकूण १९४ वाहतूक धारकांवर भरारी पथकाच्या माध्यमातून कार्यवाही करून

रू.३५.७१ लक्ष वसूल करण्यात आले. गतवर्षाच्या तुलनेत सन २००३-२००४ या वर्षात दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेले प्रकरण जास्त आहेत. मागील वर्षापेक्षा या वर्षी प्रतिदिन १६.६६% जास्त वसूली केलेली आहे. जानेवारी,फ़ेब्रुवारी,मार्च महिन्यात उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने ४ भरारी पथके स्थापन केलेली आहे व उद्दिष्टाच्या जवळपास वसूली झालेली आहे. सन २००४-०५ या वर्षासाठी ७२ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले होते. त्यात स्थायी समितीने १.०० कोटीची वाढ केलेली आहे. ७३ कोटीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जकात विभागाचे संगणकीकरण करण्याचा प्रस्ताव निविदा स्तरावर असून लेखा विभागाकडे दिलेला आहे. त्या संदर्भातील पुणे,मुंबई, महानगरपालिकेचे कामकाजाबाबत मा.आयुक्त, मी व मुख्यलेखाधिकारी यांनी केलेली आहे. त्याच धर्तीवर जकातीमध्ये संगणकीकरण झाल्यास १०% जकात आणखी वाढ होऊ शकते. मुंबई नाका तसेच नगर नाक्याजवळ गोडाऊन बांधण्याची कार्यवाही चालू आहे. नगर नाक्यासाठी छावणी बोर्डची जागा घेण्याबाबत प्रस्ताव पाठविलेला आहे तसेच मुंबई नाक्यासाठी शरनापूर येथील सर्वे नंबर ३० मध्ये दोन एकर जागा घेण्याचा प्रस्ताव सहा.संचालक नगर रचना मार्फ़त अंतीम करून नविन गोडाऊन बांधण्याचे प्रयत्न चालू आहेत. जकात विभागासाठी चांगल्या स्थितीतील वाहने असावी म्हणून प्रस्तावित केलेले आहेत. भरारी पथकासाठी चांगल्या स्थितीत असलेली वाहने आवश्यक आहे. त्यासाठी वाहने भाड्याने घेण्याचा प्रस्ताव लेखा विभागाकडे दिलेला आहे. ७३कोटीचे जे उद्दिष्ट दिले ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

श्री.मिर हिदायत अली : या शहरात मोठ्या प्रमाणात सोने - चांदीची आवक होते. सन २००३-२००४ यावर्षात सोने चांदीवर किती जकात वसूल करण्यात आलेली आहे.

उपआयुक्त (म.) : सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात सोने - चांदीची सुमारे १०.७१ कोटीची आयात झालेली आहे. व यापासून सुमारे १०.७० लाख प्राप्त झाले आहे. सन २००२-२००३ या वर्षाची आकडेवारी सध्या माझ्याकडे नाही. मार्च ला आढावा घेतला. सोन्या चांदीची जकात जास्त आली.

श्री.सुरजितसिंग खुंगर : २०/२५ मार्च २००४ ला एक गाडी विना जकात गेली १३ वर्षात पहिल्यावेळी वाहन चालकाच्या चूकीमुळे महापालिकेने ५०,०००/- रू. सक्तीने वसूल करण्यात आले दुसरी गाडी तशीच होती त्यांचे कडून मात्र रू.१०००/- वसूल केले. असा भेदभाव कशासाठी. हरनाम फ़िनोग्रम यांनी १३ वर्षात जकात चोरी केली नाही. जाणून बुजून त्यांचेकडून ५०,०००/- वसूल केले. ३१.३ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी घेतले आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : उत्पन्न बाजूवर आपण चर्चा करतो आहे. कोणी माल सोडला गाडी गेली तो प्रश्न उपस्थित होत नाही. महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करता येईल याबाबत सभागृहाचे मार्गदर्शन आवश्यक आहे.

जकात अधिक्षक : मुंबई नाक्यावर एक गाडी भरारी पथकाने थांबविण्याचा प्रयत्न केला असता सदर गाडी चालक यांनी गाडी न थांबविता,जकात न भरता डायरेक्ट शहरात माल घेवून येतो. तो माल चोरीचा असावा. म्हणून संशय निर्माण झाला, गाडी पकडण्यात येवून दंड वसूल करण्यांत आला. भरारी पथकाने वाहन चालकाचे जवाब नोंदविले. जकात चोरीची शक्यता होती म्हणून दंड आकारला. दुसरे प्रकरणांत वाहन मध्यवर्ती जकात नाक्यावर आले होते. त्याने प्रमाणपत्र घेतले नव्हते. ती वाहन कंपनीत गेली नव्हती.

श्री.सुरजितसिंग खुंगर : जकात चुकवून माल आणला चोरी पकडली चांगली बाब आहे. वसूली बद्दल अभिनंदन. कायदा सर्वांसाठी सारखाच आहे. मी आरोप करीत नाही. जकात अधिक्षक हे मर्जी प्रमाणे वाटेल तेव्हा एका गाडीचे ५०,०००/- दंड वसूल करतात तर दुसऱ्या एका गाडीचे १०००/- वसूल करतात. त्यांचेकडून ४९,०००/- कमी का घेतले. उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी घेतले आहे.

श्री.प्रकाश निकाळजे : वाहन घेवून कारखान्यात का गेले ?

श्री.सुरजितसिंग खुंगर : सर्वांकडून समान दंड वसूल करावा. केंद्र शासनाचे आदेश आहे. जकातीची तपासणी व्हावी. जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. जो कंपनी मालक जकात नियमित भरतो त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न होतो.

श्री.प्रशांत देसरडा : दर वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या वेळी सविस्तर अशी चर्चा होते. दोन वर्षापासून जकातीचे संगणकीकरण होईल असे सांगण्यात येते. नमूद केले जाते. १०% जकात वाढ झाली लेखा विभागात संचिकेस विलंब होतो का जकातीचा भरणा करतांना त्याची वस्तूवाईज जकात फ़ाडावी. कोणत्या वस्तूची किती जकात येते. उदा.दारू,सिमेंट, सोने इ.आताच खुलासा केला. सोन्या चांदीवर पूर्ण वर्षभरात फ़क्त १२ लक्ष जकात येत असेल तर खूपच कमी आहे. वस्तूवाईज जकात आकारणी करावी. फ़क्त इतिवृत्तांतात नोंद होते. पुढे काहीही होत नाही. तसेच मुंबई,नाशिक,शहरांत जकात मालासाठी गोडाऊन तयार केलेले असून ट्रान्सपोर्ट धारक तेथे वाहणे घेऊन जातात. त्याप्रमाणे वसूली केली जाते. नाशिक धर्तीवर ट्रान्सपोर्ट नगर करण्यात यावे. त्यामुळे चोऱ्या थांबतील.छावणी करार केला. टक्केवारी वाढवून दिली. कराराच्या वेळी जागा घेण्याबाबत ठरले. सहाय्यक संचालक नगररचना कडे का पाठविले.

श्री.प्रकाश निकाळजे : जकातीचे उत्पन्न जास्तीचे कसे वाढविता येईल यासाठी प्रयत्न करावे. तशी महसूल विभागाची यंत्रणा राबवावी. वसूलीसाठी ज्या ज्या साहित्याची गरज आहे ते देण्यात यावे. तसेच ज्या ज्या सदस्यांचे वार्डातील विकास कामे या अर्थसंकल्पात आलेली नाही. प्रत्येक वार्डास न्याय द्यावा.

श्री.हिदायत अली : सन २००३-०४ या अर्थसंकल्पातील जी कामे झालेली नाही. अशा काही कामाचा या अर्थसंकल्पात समावेश नाही ती सर्व कामे या अर्थसंकल्पात घेण्यात यावी. याबाबतचा अधिकार महापौरांना द्यावा.

श्री.प्रशांत देसरडा : अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर केला. २३ कोटीचे उद्दिष्ट होते. एकूण थकबाकी सह रक्कम ४५ कोटी येणार होती. २३ कोटी पैकी फ़क्त ११.१४ कोटी वसूल झाले. त्यानुसार १२% वसूली झाली असे निष्पन्न होते. पाणीपट्टी २७ कोटीचे उद्दिष्ट दिले थकबाकी २८ कोटी आहे. एकूण ५५ कोटी येणे होते. त्यापैकी ९.३९ कोटी वसूल झाले. ५३ कोटीपैकी फ़क्त ९.३९ कोटीच वसूल होते यावर प्रशासनाचे वसूलीबाबत काय भूमिका आहे, स्पष्ट करावी. कोणावर कार्यवाही केली का?

श्री.भगवान रगडे : नावाचा उल्लेख करून बजेट सादर करण्यात आले. वर्षभरात नैसर्गिक आपत्ती येते. अडी अडीचणीच्या काळात जास्तीची कामे उद्‌भवतात. अशा वेळी खर्च करण्यासाठी २ कोटीची तरतूद करावी व त्या बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात यावे.

श्री.जयवंत ओक : येणारे वर्ष निवडणूकीचे येणार आहे. आचार संहिता लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तात्काळ विकास कामे होणे आवश्यक आहे. वार्डात ड्रेनेज,लाईट,पाणी व स्वच्छता या मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी जास्तीत

जास्त भर देण्याची गरज आहे. त्या त्या वार्डात कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनास द्यावे. सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पातील बरीच कामे होणे बाकी आहे. या अर्थसंकल्पात नमूद केली नाही. कामे झालेली नाही. भविष्यात आचार संहितेचा कल बघता या अर्थसंकल्पात नमूद केलेली सर्व कामाबाबत जी जी कामे नमूद केली त्या संदर्भात वर्क ऑर्डर काढण्याबाबत तात्काळ मा.आयुक्तांना आदेश पारीत करावेत. नागरीकांना ज्या मूलभूत गरजा आवश्यक आहे त्या मिळाव्या. पाणी पुरवठ्यासाठी जास्तीत जास्त जे काही तरतूद करता येईल ती करावी. वसूली करण्याचे काम प्रशासनाचे आहे. मा.विरोधी पक्षनेते व सभागृह नेता यांनी मा.आयुक्तांशी चर्चा करून या अर्थसंकल्पातील जी जी कामे मोठ्या स्वरूपाची आहेत ती बाजूला ठेवून जनतेला अगोदर मूलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने प्रशासनाने पावले उचलावी.

श्री.गणेश तांबे : मागील वर्षात जी कामे घेतलेली होती. त्यात बदल केला. ती कामे करण्यात आली नाही. आताच्या अर्थसंकल्पात ती घेण्यात आली नाही. अशी कामे स्वील ओव्हर मध्ये घेण्यात यावी. अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहे. निधी नव्हता म्हणून लेखा विभागात संचिका थांबून आहेत.

श्री.जयवंत ओक : येणारे वर्ष निवडणूकीचे आहे. पुन्हा आचार संहिता . पाणी पुरवठ्यावर जास्तीत जास्त बजेट मध्ये तरतूद करण्यात यावी मोठ-मोठी कामे बाजूला ठेवून,ड्रेनेज,लाईट,स्वच्छता या कामासाठी जास्तीत जास्त खर्च करण्यात यावा. उद्याच्या उद्याच अंदाजपत्रकाला मंजूरी द्यावी. तात्काळ कामे करावी.

श्री.स.अली स.सलामी : या अर्थसंकल्पात ठराविक वार्डाचेच जास्तीत जास्त कामे नमूद केलेली आहेत. काही वार्डातील कामेच आलेली नाही. भडकलगेट वार्डातील एकही काम नमूद नाही. ज्याही वार्डातील मागील वर्षात नमूद केलेली कामे स्वील ओव्हर मध्ये घेण्यात यावे व नविन सुध्दा कामे करण्यात यावी. मा.महापौरांना अधिकार द्यायचे तर कसे देणार. बऱ्याच सदस्यांनी त्यांचे वार्डातील कामे यात नमूद केलेली नाही म्हणून पत्र दिले. त्यांना कामे होतील म्हणून आश्वासन द्यावे. शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. जी कामे राहीले ते बजेट मध्ये घेण्याबाबत आपण सर्वांना आश्वासन द्यावे. सभागृह आपणास सर्व अधिकार देईल.

मा.उप महापौर : महानगरपालिकेची आर्थिक बाजू बळकट होणे गरजेचे आहे. जमा बाजूवर चर्चा केल्यास खर्च बाजूवर चर्चा करता येईल असे माझे मत आहे. जमा बाजूवर चर्चा करून निर्णय न घेता खर्च बाजूवर किती चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षित वाटत नाही. मालमत्ता कराचे ५५ कोटी ऐवजी ९ कोटीच वसूल झाले. २०% वसूली झालेली आहे. खर्चाच्या बाबी समोर येत आहे. एवढी कामे करण्यासाठी रक्कम कोठून आणणार यावर चर्चा होणे गरजेचे आहे. प्रशासनास वसूली करण्यास अडचण असेल व या सभागृहाचा काय सहभाग असावा. याबाबत खुलासा करावा. वसूली झाली तर खर्च करता येईल.

श्री.गणेश तांबे : स्वील ओव्हरची कामे करण्याबाबत या सभागृहात ठराव मंजूर झालेला आहे. का कामे करण्यात आलेली नाही.

श्री.साहेबराव कावडे : उत्पन्न बाजूवर अगोदर चर्चा करावी. नंतर खर्च बाजूवर करावी.

मा.महापौर : सन २००३-०४ या आर्थिक वर्षात मालमत्ता व पाणीपट्टीची वसूली कमी प्रमाणात का झाली खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म) : मालमत्ता कराचे उद्दिष्ट २३ कोटी होते. त्यापैकी ११.१४ कोटी वसूल करण्यात आले. सन २००४-२००५ या वर्षासाठी २७ कोटीचे उद्दिष्ट दिले ते पूर्ण करण्याचा प्रशासन प्रयत्नशील राहील.

श्री.गणेश तांबे : मागील बजेट मधील जी कामे होती ती मंजूर होवून लेखा विभागात संचिका थांबून आहेत ती कामे होणार की नाही होणार नसेल तर का होणार नाही. ती अगोदरची कामे करावी नंतरच नविन कामे घेणे आवश्यक होते. या अर्थसंकल्पात ७-८ नगरसेवकाच्या वार्डातीलच कामे दिसून येतात. सभागृहाला खूष करण्यासाठीच बजेट ठेवले का ? हा सभागृहाचा अपमान आहे. मागील वर्षात नमूद केलेली जी कामे झालेली नाही ती कामे घेण्यात यावी. ती करण्यांत यावी.

मा.आयुक्त : तीन चार मुद्दयावर खुलासा करणे आवश्यक वाटते. पहिला मुद्दा असा की, मागील वर्षामध्ये विविध लेखा शिर्षकात कोणती कामे कमी करावी लागतील, कसा खर्च झाला, याचा विचार करून कामांचे अंदाजपत्रक जसे जसे समोर आले,त्याप्रमाणे लेखा शिर्षकातील खर्च झालेला आहे. व त्या लेखा शिर्षकातील रक्कमा खर्च झाल्या अशा लेखा शिर्षकातील नविन कामे जरी बजेट बुक मध्ये असेल तरी ते करता आले नाही. ज्या लेखा शिर्षकातील तरतूद संपलेली आहे व ती कामे करावयाची आहेत. बजेट बुक मध्ये नसेल अशा कामासाठी चालू आर्थिक म्हणजे आजच्या बजेट मध्ये सभागृहाला निर्णय घेता येईल. प्रशासन कोणतीच कामे जास्तीची टाकत नाही. प्रशासन कामे सुध्दा वगळीतही नाही. प्रशासनाला जी कामे तातडीची, निकडीची वाटतात ती समोर येतात. पूर्ण बजेट बुक तयार केलेले आहे. सर्व कामे स्थायी समिती समोर येतात या सभागृहा समोर ठेवली जातात. प्रत्येक वार्डातील कामे यावे अशी पध्दत आपल्या कामाची आहेत. प्रत्येक नगरसेवकांनी त्यांचे वार्डात काही ना काही प्रमाणात कामे व्हावीत असे अपेक्षित असतेच. चर्चा करून ज्या लेखा शिर्षकातील तरतूद संपलेली आहेत व कामे बाकी आहेत,अशा कामासाठी सन२००४-२००५ च्या अर्थसंकल्पात कामनिहाय त्या त्या लेखा शिर्षकात तरतूद करता येईल. तसा निर्णय घ्यावा. तरतूद किती आहेत व किती शिल्लक राहीलीत हे त्या कामावर व त्यावर झालेला खर्च यावर अवलंबून असते. दूसरा मुद्दा जो होता, पाणी पट्टी संदर्भात, यापूर्वी सभागृहात पाणी पूरवठ्याच्या संदर्भात अनेकदा चर्चाही झालेली आहे. सन २०००-२००१ मध्ये पाणीपट्टीचे उद्दिष्ट २१ कोटीचे होते सुधारीत १८ कोटी व प्रत्यक्षात ८ कोटी वसूल झालेले होते सन २००१-२००२ मध्ये २१ कोटी तर सन २००२-२००३ मध्ये २३ कोटी तर सन २००३ – २००४ मध्ये २७ कोटी होते सुधारीत बजेटमध्ये १० कोटी केले. वसुली ९.३७ कोटी झालेली आहे. प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पाच्या प्रत्येक विषयावर स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा होते. जकात उद्दिष्टाच्या संदर्भात बोलायचे झाल्यास ६९ कोटी ठेवलेले होते. मधल्या काही काळात वेळोवेळी सभागृहाने जकात वाढ होण्या संदर्भात काही सुचना केलेल्या होत्या. त्या संदर्भात प्रशासन प्रयत्नशील आहे. खाजगीकरण करण्याची प्रक्रीया चालू होती दोन्ही गोडाऊन साठी जागा घेण्याचा पाठपूरावा चालु आहे. संगणकीकरण करण्याकडे दुर्लक्ष झाले, असे नाही. संगणकीकरण करण्या बाबतच्या संचिकेचा पाठपुरावा करून आता ती संचिका लेखा विभागाकडे आहे. तो प्रस्ताव येत्या पुढील सभेत ठेवता येईल. या विभागासाठी

ज्या सुविधा लागतील त्या देण्यास प्रशासन सक्षम आहे. आठवड्याचा / महिन्याचा जकात किती येते याचा आढावा घेतला जातो. उद्दिष्टाप्रमाणे वसुलीचे प्रमाण होते. गतवर्षीच्या तुलनेत ६.५० कोटी रूपये जकातीमध्ये जास्त आलेले आहेत. ९९% वसुली झालेली आहे. असे म्हटले तरी योग्यच होईल. ६४ कोटीचे उद्दिष्ट होते. ६२.८२ कोटी वसुल झाले. मालमत्ता कराचे उद्दिष्ट २३ कोटी सुधारीत १३ कोटी वसुली ११.०४ कोटी झालेली आहे. नगर रचना विभागाचे उद्दिष्ट ४.५५ कोटी सुधारीत ३.५० कोटी वसुली ३.९० कोटी वसुली झालेली आहे. आरोग्य विभागाचे उद्दिष्ट ३३ लक्ष होते. सुधारीत बजेटमध्ये २० लक्ष प्रत्यक्ष १९.२४ लक्ष झालेली आहेत. प्राणि संग्रहालय उद्दिष्ट ३४.८० लक्ष सुधारीत ३३ लक्ष प्रत्यक्ष वसुली ३१.६४ लक्ष , उद्यान विभाग उद्दिष्ट २८.२५ लक्ष सुधारित २५.३५ लक्ष प्रत्यक्ष वसूली ३०.९६, ५.६१ लक्ष जास्त वसूली झालेली आहे. मालमत्ता विभागाचे २.०० कोटी उद्दिष्ट सुधारीत २.०४ कोटी प्रत्यक्ष वसूली १.६३ कोटी झालेली आहे. ४० लक्ष कमी वसूली झालेली आहे. यावर्षी ते निश्चित भरून काढले जाईल. पाणीपट्टी (शहर) २७ कोटी उद्दिष्ट सुधारित मध्ये १०.२२ तर प्रत्यक्ष ९.३७ कोटी वसूल झाले. पाणी पट्टी (जायकवाडी) ३.०० कोटी सुधारित मध्ये ३.३२ कोटी प्रत्यक्ष वसूली ३.५६ कोटी वसूली झाली आहे. अग्निशमन विभाग ५० लक्ष सुधारित ३०.७५ लक्ष प्रत्यक्ष वसूली १८.९७ लक्ष अनुदानसाठी पाठपुरावा करूनही १३.१० सुधारित मध्ये १३.५० तर प्रत्यक्ष प्राप्त अनुदान १३.३९ कोटी आले. इतर वसूली उद्दिष्ट ६.१३ सुधारित ७.९४ तर प्रत्यक्ष वसूली ८.६५ कोटी स्थायी समितीने सुधारित बजेट ११८.५१ कोटीस मान्यता दिलेली होती. त्यानुसार ११५.४७ कोटी एकूण वसूली झालेली असून ९८% वसूली झालेली आहे. हे मान्य करावे लागेल की प्रत्येक वर्षी कमी वसूली होत होती. या वर्षी १००% वसूल करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केलेला आहे. २-३ वर्षापासून आतापर्यंत ९८-९९ कोटी पर्यंत वसूली गेलेली आहे. या वर्षात १६ कोटी वसूली जास्त झालेली आहे. या चालू आर्थिक वर्षात सुध्दा ३० कोटी जास्त वसूली होऊ शकते. आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे व सहकार्य लाभेल यात शंका नाही. बजेटमध्ये कमी जास्त तरतूद दाखविण्यात येते ती जास्त कमी करण्याचा अधिकार सभागृहाला आहे. मागिल वर्षी जी कामे झाली नाही ती सभागृहाच्या मान्यतेने घेता येतील. त्या बाबतीत प्रशासन दक्ष राहील.

श्री.प्रशांत देसरडा : आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला ५५% टक्के वसूली झाली. पाणी पट्टीचे २८ कोटी थकीत रक्कम होती. उद्दिष्ट फ़क्त २७ कोटीच ठेवण्यात आले. २७ + २८ कोटी असे एकूण ५५ कोटी रूपये नागरीकाकडून येणे आहे. एखादा नागरिक थकीत रक्कम भरणा करण्यासाठी आल्यास ती रक्कम आपण भरून घेतो. याचा अर्थ २७.०० कोटी ऐवजी ५५ कोटीचेच उद्दिष्ट असणे गरजेचे होते. झोन अधिकारी थकीत रक्कम का वसूल करीत नाही. जे काम करीत नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी की, ज्यांनी चांगले काम केले, त्याचा या सभागृहातर्फ़े सत्कार सुध्दा करावा या मताचा मी आहे. ५५ कोटी पैकी फ़क्त ९.३७ कोटीच वसूल होते.

श्री.सुनिल मगरे : मागील वर्षाच्या वसुलीचा आताच आढावा मा.आयुक्तांनी सादर केला. जकातीचे उद्दिष्ट ६९ कोटी ठेवण्यात आले होते. ६४ कोटी सुधारीत करण्यांत

आले. प्रत्यक्ष वसूली फ़क्त ६२.८२ कोटी झालेली आहे. मालमत्ता २३ कोटी सुधारीत मध्ये १३ कोटी तर प्रत्यक्ष वसूली १० कोटी करण्यात आली. चालू वर्षात जकातीचे ७२ कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. मालमत्ता कराचे २३ कोटी तर पाणीपट्टीचे २७ कोटी ठेवलेले होते. जकात विभागात चांगल्या प्रकारची वसूली झालेली आहे. उद्दिष्ट साधण्याचा प्रयत्न केला. जकात विभागाचे अभिनंदन. मालमत्ता कर वसूली साठी पूरेसा कर्मचारी वर्ग असतांना उद्दिष्ट पूर्ण का झाले नाही. या अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात आकडेवारी देवून फ़ुगवून दाखविण्यात आलेले आहेत. मालमत्ता कर व पाणी पट्टी वसूली संदर्भात ५० % आकडेवारी जास्तीची वाढवून दिली. आकडे फ़ुगवून देण्याची गरज नाही. या वर्षाची जी टारगेट दिले ते वसूल होण्यासाठी प्रशासनाने काय उपाय योजना केलेल्या आहेत. आकडे फ़ुगवून दिशाभूल करण्यांत येत आहे. प्रशासनाचे काय नियोजन आहे.

मा.आयुक्त : सविस्तर अशी चर्चा स्थायी समितीमध्ये झालेली आहे. मालमत्ता कराच्या संदर्भात काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत त्यात मोठ्या रक्मा आहेत. कमेटी नेमून पाठपूरावा करण्यात येत आहे. प्रशासना मार्फ़त सर्व प्रयत्न होतात. त्याचप्रमाणे या प्रकारची वसूली जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती यांचे कडे सुध्दा बैठका होतात. वसूलीच्या कामात कर वसूल करण्यामध्ये घराचा वाद असणे,न्यायप्रविष्ठ प्रकरण असेल अशा प्रकारच्या केसेसमध्ये झोनल कमिशनरला अधिकार देवून अशी प्रकरणे निकाली काढण्या बाबत प्रयत्न होत आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणाच्या बाबत विधिसल्लागार यांनी पाठ पुरावा करून ती प्रकरणे तात्काळ निकाली कशी निघतील त्या बाबत सुचना केलेल्या आहेत. तसेच स्थगिती असेल तर ती देखील उठविण्याचा प्रयत्न करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. जेव्हा चालू मागणी व थकीत मागणी आपण विचारात घेतो. ज्यांचेकडे मोठमोठ्या रक्कमा करापोटी शिल्लक आहे त्यांचे विरूध्द कडक कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. जी थकबाकी आहे ती प्रामाणिकपणे प्रशासनाने समोर आणलेली आहे. जेव्हा स्थायी समिती मध्ये बजेट रिवाईज करतो, मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या अन्य रक्कमा काही प्रकरणांमुळे थांबून असतात वसूल करण्यास अडचण निर्माण होते. म्हणून अशा डिसपुटेड केसेस निकाली काढण्याचा प्रयत्न होत आहे. अशा प्रकरणामुळे त्याचा वसूलीच्या उद्दिष्टावर होतो. ज्या थकबाकी दराचे प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. अशा प्रकरणाच्या बाबत वाट न बघता मालमत्ता जप्त करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

श्री.डॉ.भागवत कराड : मालमत्ता कराचे उद्दिष्ट २३.०० कोटी ठेवण्यात आले. १३ कोटी सुधारीत मधे तर प्रत्यक्ष वसूली ११.१३ कोटी करण्यात आली. सन ०४-०५ साठी २४ कोटी उद्दिष्ट ठेवले. मालमत्ताचे सर्वेक्षण करणार आहोत. पुन्हा सुधारित बजेट मध्ये टारगेट कमी केले जाते. सर्वेक्षण काम सुरू आहे. महापालिका हद्दीत अधिकृत आणि अनधिकृत बांधकाम मोठ्या प्रमाणात चालू आहे व झालेलेही आहे. तरी अशा काही घरांना कर लागलेला नाही. २४ कोटी पेक्षा जास्त मालमत्ता कर वसूल होऊ शकतो. नुकतेच कर निर्धारण अधिकारी म्हणून श्री.फ़ड साहेब रूजू झालेले आहे. आता करमूल्य निर्धारण विभाग सक्षम झालेला आहे. म्हणून कराच्या रक्कमेत मोठ्या प्रमाणात भर पडून २४ कोटी

पेक्षा जास्त उद्दिष्ट ठेवले जावेत अशी अपेक्षा आहे. २८ कोटीची नागरीकाकडे थकबाकी आहेत. मालक/ महानगरपालिका यांचेत न्यायालयात वाद चालू असतो. अशी प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना केलेली होती. असे न्यायालय स्थापन झाल्यास ताबडतोब प्रकरण निकाली लागेल व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होईल. तसेच मालक व महानगरपालिका यांचेत जो अंतर्गत कर कमी जास्त लावण्यावरून वाद असेल अशा प्रकरणाच्या बाबत मा.आयुक्त यांनी जातीने लक्ष देऊन प्रकरणे निकाली काढावी. जे लोक कर भरतात तेच कर भरतात जे कर भरणा करीत नाही ते कर भरणाच करीत नाही. २४ कोटी ऐवजी २८ कोटी किंवा जे काही शक्य असेल तेवढे उद्दिष्ट ठेवण्यात यावे. उत्पन्न वाढले पाहिजे. वार्डातील कामे झाली पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे : आताच मा.आयुक्तांनी झालेल्या वसूली संदर्भात सविस्तर खुलासा केला एकूण ११५ कोटी वसूल करण्यात आले मागिल वसूलीच्या प्रमाणापेक्षा १६ कोटी जास्त वसूल झाले असा खुलासा केला परंतू नैसर्गिक वाढ १०% असतेच. जकात विभाग वगळला तर इतर विभागाची वसूली समाधान कारक वाटत नाही. वसूली न होण्याचे कारणे वेगळी असतील. डिसपुटेड प्रकरण असेल,कोटी प्रकरण असेल जी वसूली झाली ती नैसर्गिक वाढ प्रमाणे झालेली आहे. कोणत्या प्रकारची प्रशासनाने कार्यक्षमता दाखविलेली नाही असे स्पष्ट माझे मत आहे. प्रत्येक वेळ ४ वर्षापासून अनुभव येतो. गोलमोल अर्थसंकल्प सादर केला जातो. वसूली होत नाही. त्यामुळे ठरल्या प्रमाणे वार्डात कामे होत नाही. प्रशासनास सभागृहाकडून काय अपेक्षा आहेत. स्पष्ट करावे. जकातीचे संगणकीकरण करण्याबाबत २-३ वर्षापासून अर्थसंकल्पाच्या वेळी प्रस्ताव समोर येतो परंतू कार्यवाही प्रत्यक्षात होत नाही. न्यायप्रविष्ट प्रकरणांत विधी विभाग योग्य मार्गदर्शन न्यायालयाच्या निदर्शनास आणून देत नाही. म्हणून जवळपास सर्वच प्रकरणाचा निकाल महानगरपालिकेच्या विरोधात लागतात म्हणून या विभागावर विश्वास ठेवणे कितपत योग्य आहे. एखाद्या प्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागला असे दिसून येत नाही. म्हणून सभागृहाच्या वतीने विनंती की डिसपुटेड केसेस बाबत प्रशासनाने तात्काळ पावले उचलावी व अशी प्रकरणे ताबडतोब निकाली काढावी. कर आकारणी करतांना तफ़ावत दिसून येते. एका घराला ५०० टॅक्स, तर बाजूच्या घराला ५०००/- रू. जास्तीचा टॅक्स त्यामुळे ज्यांना जास्त टॅक्स दिला जातो ते न्यायालयात जातात त्यामुळे वसूलीवर परिणाम होतो व अर्थसंकल्पात नमूद केलेली कामे होणे गरजेचे असून या परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा,ड्रेनेज लाईन,रस्ते,स्वच्छता व विज या मूलभूत सुविधा देण्यावर जास्तीत जास्त भर द्यावा. अनधिकृत जे बांधकाम होते त्यावर स.सभासद तसेच प्रशासनाने लक्ष देऊन त्यास आळा घातला पाहिजे. वसूली करण्यावर प्रशासनाने कर द्यावा सभागृहाकडून काय अपेक्षा आहेत स्पष्ट करावे. एकमेकास साह्य करू अवघे धरू सुपंथ या म्हणी प्रमाणे प्रशासनाने वसूली करावी. या सभागृहाचे सहकार्य नक्कीच आपल्या बरोबर आहे.

श्री.तकीहसन खॉन : जकात वसूली चांगल्या प्रकारे झाली परंतू काही झोनची वसूली ही टारगेट पेक्षा जास्त झालेली आहे. टारगेट पेक्षा जास्त ११३% वसूली झोन क्र.१ ची झालेली आहे. झोन अधिकाऱ्याचे अभिनंदन करावे.

श्री.सुनिल मगरे : झोन क्र.१ ची वसूली टारगेट पेक्षा ११६% वसूली जास्त झालेली आहे. त्या झोन अधिकाऱ्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करावे.

श्री.किरमानी ईलियास : लवकरच अर्थसंकल्पावर चर्चा करून निर्णय घ्यावा. आजच मंजूरी द्यावी जेणे करून विकास कामे थांबून राहणार नाही. शिवाय विधान सभेची आचार संहिता लागण्याची शक्यता आहे. दुसरा मुद्दा असा की आजच्या वृत्तपत्रात बातमी आली की, महापौरांना देण्यात आलेल्या कॉफ़ीमध्ये विष होते. मा.महापौरांना काही झाले असते तर आजची सभा घेता आली नसती. यास जबाबदार कोण या अर्थसंकल्पात संपूर्ण शहराचा विकास होण्याची कामे आहेत. काही घटना घडली असती तर बजेट मध्ये मंजूर झाले नसते. या बाबत खुलासा झालाच पाहिजे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर जाऊन स.सदस्य या संदर्भात सविस्तर खुलासा व्हावा म्हणून मागणी करतात मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकावयास येत नाही.

श्री.हिदायत अली : वृत्तपत्रात छापून आले. प्रशासनाने खुलासा करावा. विष होते तर पोलिसात गुन्हा का दाखल केला नाही.

मा.महापौर : या बाबत चौकशी चालू आहे. सध्या हॉटेल बंद केलेले आहेत.

श्री.स.अली मिरा सलामी : सी.बी.आय. चौकशी व्हावी. प्राण घेण्याचा हा डाव होता. घाटी दवाखान्यात आपल्या स्वीय सहाय्यक यांना का ॲडमिट केले नाही. खाजगी दवाखान्यात का ॲडमिट केले. यात कोणाचा हात आहे.

श्रीमती शाहीन जफ़र : आपण संपूर्ण शहराचे महापौर आहात. असा प्रकार करणाऱ्यांना कडक कार्यवाही होणे आवश्यक आहे. चौकशी करावी.

श्री.हिदायत अली : ज्यांचे कामे होत नाही अशा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी हे कारस्थान केले असावे. चौकशी करण्यात यावी.

मा.महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. याबाबत चौकशी चालू आहे.

श्री.ईलियास किरमानी : कॉफ़ी मध्ये विष देण्याचा जो प्रयत्न झाला त्या बाबत आपला कुणावर संशय आहे का खुलासा करावा नसता

मा.महापौर : या बाबत प्रशासन चौकशी करेल.

श्री.हिदायत अली : स्वीय सहाय्यक श्रीमती गुळवे यांनी आपल्यासाठी मागविलेली कॉफ़ी घेतली त्यात विष होते का ? त्यांना कॉफ़ी दिल्यानंतर त्रास जाणवला म्हणून त्यांना घाटी दवाखान्यात ॲडमिट न करता खाजगी दवाखान्यात का ॲडमिट करण्यात आले. खुलासा देण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : कॉफ़ी विष प्रकरणाबाबत प्रशासन कार्यवाही करेल अशा सुचना आपण दिली. अर्थसंकल्पावर सविस्तर अशी स.सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले. त्यावर प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.ईलियास किरमाणी : संबंधीत स्वीय सहाय्यक त्या दिवशी कार्यालयात कामावर होते का मा.महापौरांना संशय कुणावर आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर : काल सकाळी ११.३० च्या दरम्यान आमच्या दालनात कॉफि मागविण्या आली आमचे स्वीय सहाय्यक यांनी अगोदर कॉफि घेतली त्यात विष होते अशी चर्चा झाली ती कॉफि कोठून व कोणी मागविली होती, त्यात विष होते का? याची चौकशी करून कडक कार्यवाही करण्यांत यावी.

श्री.गाजी सादोद्दीन : आपला कुणावर संशय आहे, खुलासा करावा.

| | |
|---|---|
| श्री.अफ़सरखॉन | : सरकारी कर्मचारी असल्यानंतर रिपोर्टची आवश्यकता असते. असा प्रकार घडल्यास सरकारी दवाखान्यात दाखल करणे आवश्यक असते. कोणत्या खाजगी दवाखान्यात ॲडमिट केले. घाटी दवाखान्यात का ॲडमिट केले नाही. |
| मा.महापौर | : या बाबत चौकशी चालू असून प्रशासनाकडून माहिती घेता येईल. |
| डॉ.भागवत कराड | : अर्थसंकल्पावर चर्चा चालू आहे. २-३ विषय चर्चेला घ्यावे. मान्यता द्यावी. |
| श्री.स.अली.मीरा सलामी | : मा.महापौरांना कॉफ़ी मध्ये विष देण्याचा प्रकार झाला. त्यांनी कॉफ़ी घेतली असती तर आजची सभा घेता आली नसती. आजची सभा महत्वाची असून सर्व जनतेचे प्रश्न यात येतात. आजच्या बैठकीच्या प्रश्नावर काय निर्णय घेतात म्हणून सर्व नागरीकांचे लक्ष आहेत. |
| श्री.शे.ईलियास किरमानी | : मा.सभापती,सभागृहनेता यांनी विष देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशी चर्चा चालू आहे. हे सत्य आहेत का आपला कुणावर संशय आहेत का ? कोणत्या खाजगी दवाखान्यात ॲडमिट केले त्याचा ही खुलासा द्यावा. त्या डॉक्टरांनी ॲडमिट करून कसे घेतले. चौकशी करण्यात यावी. |
| मा.महापौर | : चौकशी होईल. |
| श्री.सुनिल मगरे | : पोलिसात गुन्हा का दाखल केला नाही. |
| मा.महापौर | : माझा कोणावरही संशय नाही. याबाबत चौकशी होईल. |

याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने स.सभासद डायस समोर जाऊन खाली बसतात, बोलतात काहीही ऐकू येत नाही.

| | |
|---|---|
| मा.महापौर | : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. |
| श्री.भागवत कराड | : अर्थसंकल्पावर चर्चा करून निर्णय घ्यावा. नसता जकातीमध्ये ३ कोटी मालमत्ता २ कोटी व पाणी पट्टी मध्ये १ कोटीची अशी एकूण ६ कोटीची वाढ दर्शवून हा अर्थसंकल्प मंजूर करावा. विकास कामाच्या बाबत पदाधिकारी यांचेशी चर्चा करून निर्णय घेता येईल. याबाबतीत सर्व अधिकार मा.महापौरांना द्यावेत. |
| श्री.हिदायत अली | : विष होते तर पोलिस गुन्हा का दाखल केलेला नाही. तसेच आजची सभा तहकूब करावी. संबंधीत हॉटेल मालक यावर पोलिस गुन्हा दाखल केला का ? त्यानंतरच सभेचे कामकाज सुरू करावे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा झालेली आहे. मान्यता देण्यांत यावी. |
| मा.महापौर | : सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात जकातीचे उद्दिष्ट ३ कोटी, मालमत्ताचे २ कोटी तर पाणी पट्टीचे उद्दिष्ट १ कोटी वाढवून देण्यात येते. त्या प्रमाणे वसूली करावी व कामे अंतिम करण्याचे अधिकार महापौरांना देण्यात येत आहे. अर्थसंकल्पास मान्यता देण्यात येते. |

**ठराव :**

स्थायी समितीने दि.१० व ११ फेब्रुवारी २००४ रोजी संपन्न झालेल्या विशेष अर्थसंकल्पीय बैठकीत सर्वकष चर्चा करून मा.सर्व साधारण सभेपूढे सादर केलेले सन २००३-२००४ चे सुधारित व २००४-२००५ चे मुळ अंदाजपत्रकावर सभागृहात दि.१८ मे २००४ रोजी झालेल्या चर्चेनुसार अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष निहाय काम व रकमेत बदल / फेरफार व दुरूस्त्या करून सन २००३-२००४ चे सुधारित अंदाजपत्रक रू.११८ कोटी ५१ लाख जमा व त्यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.१८ कोटी २९ लाख ३१ हजार विचारात घेता एकुण रू.१३६ कोटी ८० लाख ३१ हजार एकुण जमेचा व रू.१३६ कोटी ५२ लाख १० हजार खर्च विचारात घेऊन रू.२८.२१ लाख शिलकीचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते.

तसेच सन २००४-२००५ चे मुळ अंदाजपत्रकावर सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे जकात वसुलीत ३.०० कोटी, मालमत्ता कर २.०० कोटी व पाणीपट्टी वसुलीत १.०० कोटी अशी एकुण ६.०० कोटीची वाढीव वसुलीचे उद्दिष्ट देण्यात येऊन या वाढीव रकमेतील कामांचे नियोजन करण्याचे अधिकार मा.महापौरांना प्रदान करण्यासह सन २००४-२००५ चे जमा रूपये १७३ कोटी ०७ लाख ५६ हजार व खर्च रूपये १७२ कोटी ८० लाख ९५ हजार व रूपये २६.६१ लाख शिलकी रक्कमेच्या अर्थसंकल्पास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ‘‘ जन गण मन ‘‘ या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद